RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३ रा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१७ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## रामलल्ला आज नव्या मंदिर परिसरात, उद्या गर्भगृहात

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

रामलल्लांच्या २२ जानेवारीला होणाऱ्या बहुप्रतिक्षित प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी मंगळवारी मंदिर ट्रस्टचे सदस्य आणि त्यांच्या पत्नींच्या उपस्थितीत वेगवेगळ्या विधींनी सुरुवात झाली. मंगळवारी प्रायश्चित्त आणि कर्मकुटी पूजा झाली. अयोध्येतील नवीन मंदिरात रामलल्लाच्या मूर्तीचा अभिषेक, प्राणप्रतिष्ठा सोहळ्याने याची सांगता होईल.प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी अनुष्ठान सुरू झाले असून ते अभिषेक समारंभापर्यंत सुरू राहील. अकरा पुजारी सर्व देवी-देवतांना आवाहन करून विधी



करत आहेत, असेराम मंदिराचेमुख्य पुजारी सत्येंद्र दास यांनी सांगितले. अंतिम अभिषेकापर्यंत सर्व विधींचे यजमानपद ट्रस्टचे सदस्य अनिल मिश्रा आणि त्यांची पत्नी उषा मिश्रा यांच्याकडे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणारे विधी मिश्रा दाम्पत्यांच्या हस्ते होणार आहे.प्रायश्चित, कर्मकुटी पूजा कशासाठी?

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावेळी अनावधानाने काही चुका झाल्यास किंवा आतापर्यंतच्या एकूण कार्यात कमतरता राहिल्यास त्याबाबतचे प्रायश्चित म्हणून ही पूजा केली जाते. कर्मकुटी पूजा म्हणजे यज्ञशाळा पूजन होय. यामध्ये भगवान विष्णूंना आवाहन करून त्यांच्याकडून मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी मिळविली जाते.

### रामलल्लाच्यामूर्तीचे आज आगमन

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापैकी बुधवारी (१७ जानेवारी) रामलल्लांची मूर्तीचे मंदिर परिसरात आगमन होणार आहे. गुरुवारी मूर्ती गर्भगृहात ठेवण्यात येणार आहे. तसेच तीर्थपूजन, जलयात्रा, जलाधिवास आणि गंधाधिवास विधी पार पडणार आहेत.

### २३ दिवसांत मोठे काम

श्रीराम मंदिराचेकाम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येत आहे. २४ डिसेंबर रोजी सुरू असलेले काम आणि मंगळवारी १६ जानेवारीपर्यंत झालेल्या कामातून त्याची प्रचिती येते. शिखरासह प्रवेशद्वारावर विराजमान असलेले सिंहदेखील दिसत आहेत.

## शिंदे गटाची हायकोर्टात याचिका; नार्वेकर आणि ठाकरे गटाला बजावली नोटीस

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई : ६१**

ठाकरे गटाचे आमदार पात्र ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयाविरोधात शिंदे गटाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज न्यायालयात सुनावणी झाली. याप्रकरणी उच्च न्यायालयाने ठाकरे गट आणि राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावली आहे.



तसेच, ८ जानेवारीपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

आमदार अपात्रता प्रकरणी उच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. ठाकरे गटाचे आमदार अपात्र करण्याची याचिकेत शिवसेनेची मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. व्हिप न मानणाऱ्या ठाकरे गटातील आमदारांना अपात्र करा, अशी शिंदे गटाची मागणी आहे. शिवसेना शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी ही याचिका दाखल केली असून १३ याचिकांवर आज तातडीची सुनावणी झाली आहे. यावेळी सर्वोच्च न्यायालय या प्रकरणाची सुनावणी करत आहे का, अशी विचारणाही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना केली.दरम्यान, शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर विधानसभा अध्यक्षांनी निर्णय दिला. यावेळी नार्वेकर यांनी शिवसेना एकनाथ शिंदेंचीच म्हणत शिंदे गटाला पात्र ठरविले. सोबतच, ठाकरे गटाचे सर्व आमदार पात्र असल्याचेही निर्वाळा दिला होता. याविरोधात ठाकरे ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहेत. तर, शिंदे गटाने उच्च न्यायालयात याचिका दाखल करत ठाकरे गटाच्या सर्व १४ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी केली आहे.

## रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी मॉरिशसमध्ये २ तासांची सुट्टी

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक पोर्ट लुईस :**

येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येतीलराम मंदिरातहोणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त त्या दिवशी प्रार्थनेमध्ये सहभागी होण्यासाठी मॉरिशस सरकारने हिंदूधर्मीय कर्मचाऱ्यांना दोन तासांची विशेष रजा जाहीर केली आहे.यासंदर्भात पंतप्रधान प्रवींदकुमार जगन्नाथ यांनी सांगितले की, २२ जानेवारी रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत सरकारी खात्यांतील हिंदूधर्मीय कर्मचाऱ्यांना विशेष रजा मंजूर करण्यात आली आहे. हाप्राणप्रतिष्ठा सोहळा अतिशय महत्त्वाचा आहे, असे जगन्नाथ यांनी म्हटले आहे.

मॉरिशसमध्ये हिंदूधर्मीय बहुसंख्येने आहेत. २०११ साली झालेल्या जनगणनेनुसार मॉरिशसमधील एकूण लोकसंख्येपैकी ४८.५ टक्के लोक हे हिंदू आहे.ब्रिटिशांनी भारतीयांना नेले मॉरिशसमध्येमॉरिशसमध्ये फ्रेंच, ब्रिटिशांमुळे भारतीयांचे येणे झाले.१९व्या शतकात मॉरिशसमधील उसाच्या मळ्यांमध्ये काम करण्यासाठी ब्रिटिशांनी महाराष्ट्र, बिहार, यूपी इत्यादी राज्यांतून भारतीयांना मॉरिशसमध्ये नेले.

## शिंदेंकडून दावोसमध्ये पहिल्याच दिवशी ७० हजार कोटींचा करार; महाराष्ट्रात येणार ३ मोठे प्रकल्प

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक दावोस**

आज दावोस येथे राज्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा तीन प्रकल्पांसाठी सामंजस्य करारा करण्यात आला आहे. तब्बल ७० हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर मॅग्रेटिक महाराष्ट्राच्या अद्ययावत अशा दालनात स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उद्योग मंत्री उदय सामंत देखील उपस्थित होते.



ग्रीन हायड्रोजनच्या महाराष्ट्राच्या धोरणाला आज चांगली बळकटी मिळाली. दावोस येथे आयनॉक्स एअर प्रोडक्शन बरोबर २५ हजार कोटींच्या सामंजस्य करारावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली.यावेळी कंपनीचे सिद्धार्थ जैन यांच्याबरोबर मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली चर्चा केली. आयनॉक्स ही कंपनी अमेरिकेतील एक मोठी औद्योगिक वायू उत्पादित करणारी कंपनी असून महाराष्ट्रामध्ये ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करण्यात त्यांना रुची आहे. महाराष्ट्रामध्ये ग्रीन हायड्रोजन आणि अमोनिया प्रकल्प सुरू करण्यासंदर्भातही मुख्यमंत्र्यांशी श्री जैन यांची चर्चा झाली.

जिंदाल यांच्यासमवेत ४१ हजार कोटींच्या करारावर स्वाक्षऱ्यादेशातील एक मोठा उद्योग समूह असलेल्या बीसी जिंदाल यांच्याशी ४१ हजार कोटींच्या सामंजस्य करारावर देखील आज स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यामुळे ५००० नोकऱ्या इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाईन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात महाराष्ट्रात निर्माण होतील. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हबसाठी चार हजार कोटी रुपयांचा करारमहाराष्ट्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा हब निर्माण करण्यासाठी महाप्रीत आणि अमेरिकेच्या प्रिडीक्शन्स ४००० कोटी रुपये गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला यामुळे महाराष्ट्रात नाविन्यपूर्ण अशा आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा प्रकल्प सुरू होईल. अशाप्रकारे भारतात सुरू होणारा हा पहिलाच प्रकल्प आहे.महाराष्ट्राच्या दालनात या सामंजस्य करारावर स्वाक्षरीच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपिन शर्मा उपस्थित होते.

## मी आणि प्रणितीनं भाजपात यावं अशी ऑफर काँग्रेसच्या सुशीलकुमार शिंदेंचा गौप्यस्फोट

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक सोलापूर**

दोन वेळा पराभव झाला तरी मला आणि प्रणितीलाभाजपानंपक्ष प्रवेशाची ऑफर दिली. परंतु आमच्या रक्तात काँग्रेस असल्याने ते शक्य नाही असा गौप्यस्फोट काँग्रेसचे ज्येष्ठ नेतेसुशीलकुमार शिंदेयांनी सोलापूरात केला आहे.एका कार्यक्रमात सुशील कुमार शिंदे म्हणाले की,माझा दोनदा पराभव झाला तरीही मला आणि प्रणितीताईलाभाजपाया अशी ऑफर आली आहे. ज्या आईच्या कुशीत आम्ही वाढलो. जिथं आमचं बालपण, तारुण्य गेले. आता ८३ वर्षाचा आहे. आता दुसऱ्याच्या घरात कसं जाणार? हे शक्य नाही. प्रणितीही अशा पक्षबदलाच्या भानगडीत कधी पडणार नाही. राजकारणात असं होत राहते. पराभवाबाबतीत एका पंडित नेहरू म्हणाले होते, लहान मुलाला सुरुवातीला आधार देऊन चालवावे लागते. त्यानंतर तो स्वत:चालतो. चालताना पडतो, पुन्हा उठतो आणि पुन्हा पडतो, उठतो मग चालायला लागतो आणि जेव्हा चालायला लागतो तेव्हा तो पुन्हा कधी पडत नाही. आपल्यालाही पुन्हा वैभवाचे दिवस येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तर काँग्रेसचे नेते भाजपाच्या संपर्कात आहेत की भाजपा काँग्रेस नेत्यांच्या संपर्कात आहे हे एकदा स्पष्ट करा.सुशीलकुमार शिंदेयांना दोनदा ऑफर दिली परंतु ते काँग्रेस सोडून कुठे जाणार नाहीत. प्रणितीही कुठे जाणार नाही याची मला खात्री आहे. पण भाजपाचा आत्मविश्वास ढळलेला आहे. प्रशासकीय कामावर भाजपाला विश्वास राहिलेला नाही. महाराष्ट्रातील नेत्यांवर विश्वास नसल्याने इतर पक्षातील नेत्यांना भाजपासोबत घेतेय. एकनाथ शिंदे, अजित पवारांना घेतले आणि काँग्रेस नेत्यांना घेण्याचा प्रयत्न आहे. परंतु आता भाजपाचा पराभव दिसत असताना कुणीही त्यांच्यासोबत जायला तयार नाही. काँग्रेसमध्ये नाराजी नाही. एखाद्याला पद मिळाले नाही तर नाराज होते. पक्षामुळे माणसं मोठी होतात, वैयक्तिक कुणी मोठे होत नाही असा टोलापृथ्वीराज चव्हाणयांनी भाजपाला लगावला.दरम्यान, मोदींना आत्मविश्वास असता तर अर्धवट असतानाही मंदिरात रामाची प्रतिष्ठापना केली नसती. आता भाजपाकडे काही काम राहिले नाही. भाजपाचे महाराष्ट्रातील नेतृत्व अपयशी ठरल्याने ते इतर पक्षातील नेत्यांना गळ घालत आहेत असंही चव्हाण यांनी म्हटलं आहे.



## भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होऊ, पण...;प्रकाश आंबेडकरांची काँग्रेससमोर मोठी अट

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

खासदारराहुल गांधीयांच्या नेतृत्वामध्येकाँग्रेसच्याभारत जोडो न्याय यात्रेला आज मणिपूरमधून सुरुवात झाली आहे. भारत जोडो न्याय यात्रा मणिपूरपासून ६ हजार ७१३ किलोमीटर अंतर पार करून २० मार्च रोजी मुंबईमध्ये समाप्त होणार आहे.राहुल गांधीयांच्या भारत जोडो यात्रेचा हा दुसरा टप्पा आहे. इंडिया आघाडीतील तसेच विरोधी पक्षातील नेत्यांनी या यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहनकाँग्रेसकडूनकरण्यात आले



आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेतेप्रकाश आंबेडकरयांनाही या यात्रेत सहभागी होण्याबाबत विचारणा करण्यात आली. मात्र,प्रकाश आंबेडकरयांनी या यात्रेत सहभागी होण्याबाबत एक अट ठेवली आहे.वंचित बहुजन आघाडीला राज्यातील महाविकास आघाडीत घेण्याबाबत अद्यापही चर्चा सुरू आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीची युती झाली असल्याचे म्हटले आहेत. मात्र, महाविकास आघाडीतील समावेशाबाबत अद्याप स्पष्टता नाही. तसेच राष्ट्रीय स्तरावरील इंडिया आघाडीत वंचित बहुजन आघाडीचा समावेश व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यातच प्रकाश आंबेडकर यांनी भारत जोडो न्याय यात्रेतील सहभागाबाबत अट ठेवली आहे.भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होऊ, पण...

भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होण्याचे आमंत्रण राहुल गांधी यांनी प्रकाश आंबेडकरांना दिले आहे. प्रकाश आंबेडकरांनी या यात्रेत सहभागी होण्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. इंडिया आघाडी सामील करून घ्या, तरच भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी होतो, अशी अट प्रकाश आंबेडकरांनी काँग्रेससमोर ठेवली आहे. तसे पत्र प्रकाश आंबेडकर यांनी राहुल गांधी यांना लिहिले आहे.

## इंजेक्शन दिलेल्या पैलवानाची ताकद फार काळ टिकत नाही : देवेंद्र फडणवीस

**दि. १७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राहुल नार्वेकर यांनी जो निकाल दिला त्याला कुठला आधार नाही. ते खोटारडे असल्याचे भक्कम पुरावे आम्ही दिले आहेत असं वक्तव्य आज संजय राऊत यांनी केलं आहे. तसंच महाराष्ट्रातली जनता तुम्हाला रस्त्यावर फिरणं कठीण करेल. शिवसेना महाराष्ट्राच्या अस्मितेचं प्रतीक आहे हे कसले मराठी? असाही प्रश्न विचारला आहे. मुंबईत मंगळवारी उद्धव ठाकरे यांची महापत्रकार परिषद पार पडली. त्यात त्यांनी अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. तसंच राहुल नार्वेकर यांच्यावरही टीका करण्यात आली. या सगळ्याला राहुल नार्वेकरांनी उत्तरही दिलं. तसंच भाजपा नेत्यांकडूनही उद्धव ठाकरेंवर टीका होते आहे. या सगळ्या घडामोडींचे पडसाद आज दिवसभरात उमटणार आहेत. तसंच राम मंदिरावरुनही आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. अशा सगळ्या घडामोडींकडे आपली नजर या लाइव्ह ब्लॉगच्या माध्यमातून असणार आहे.

## काँग्रेसमध्ये दोन गट? सोनिया गांधी-खरगेंचा नकार : ...पण पक्षातील १०० नेते अयोध्येला जाणार

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

राम मंदिरातहोणाऱ्या रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या लगबगीने वेग घेतला आहे. २२ तारीख जवळ येत आहे, तसे राजकारणही अधिक तापताना दिसत आहे.काँग्रेसअध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, नेत्या सोनिया गांधी तसेच विरोधी पक्षनेते अधीर रंजन चौधरी यांनी अयोध्येच्या सोहळ्याला जाण्यास नकार दिला आहे. असे असताना मात्रकाँग्रेसचे१०० नेते अयोध्येला जाण्यावर ठाम असल्याचे सांगितले जात आहे.काँग्रेसचेउत्तर प्रदेशमधीलप्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, कार्यक्रमात कोणताही बदल नाही, माझ्यासह राज्यातील विविध पक्षांचे नेते ठरल्यानुसार, १५ जानेवारीला अयोध्येला जाणार आहेत. पवित्र शहर अयोध्या भेटीदरम्यान, पक्षाचे नेते शरयू नदीत स्नान करतील. नंतरराम मंदिरआणि हनुमानगढी मंदिरात प्रार्थना करतील. अजय राय यांनी सांगितले होते की, १५ जानेवारीला अयोध्येला जात आहे. आमचे सरचिटणीस आणि राज्य प्रभारी अविनाश पांडे आणि ज्येष्ठ नेते प्रमोद तिवारी आणि पी.एल.



पुनियाही अयोध्येला जाणार आहेत. सुमारे १०० काँग्रेस नेते तेथे जाणार आहेत, अशी माहिती काँग्रेसमधील एका ज्येष्ठ नेत्याने दिल्याचे समजते.अयोध्येला जाण्याचा कार्यक्रम पूर्वनियोजित, त्यात बदल नाही.

भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेत्यांचा अपूर्ण मंदिराच्या उद्घाटनामागील हेतू काय, अस सवाल काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला होता. काँग्रेस नेते अयोध्येला जाणार नाहीत, यावर बोलताना प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, २२ जानेवारीला होत असलेला प्राणप्रतिष्ठा सोहळा वेगळा आहे. आम्ही मकर संक्रांतीला जात आहोत.उत्तर प्रदेशचेराज्य प्रभारी अविनाश पांडे यांच्यासह सुमारे १०० काँग्रेस पदाधिकारी १५ जानेवारीला मकर संक्रांतीच्या दिवशी अयोध्येला जाणार असल्याचे यापूर्वीच ठरले होते. त्यात बदल केलेला नाही.दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण मिळण्यावरून मानापमान नाट्य रंगल्याचे पाहायला मिळत आहे. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास हजेरी लावण्यावरून अखिलेश यादव यांनी काही विधाने केली होती. तसेच निमंत्रण मिळाले नसल्याचे म्हटले होते. यानंतर मात्र आता राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण मिळाले आहे, अशी कबुली अखिलेश यादव यांनी दिली. तसेच आमंत्रण मिळाले असले तरी या सोहळ्याला जाणार नाही, असे यादव यांनी स्पष्ट केले आहे.

## संपादकीय ......

# 'वंचित बहूजन आघाडी' : नवी ओळख, नवी आव्हानं...

गेली साडेतीन दशके भारिप- बहुजन महासंघ वऱ्हाडच्या सीमा ओलांडून बाहेर जायला तयार नाही. इतर अठरापगड जातींना सोबत घेतल्याधिवाय सत्तेचा सोपान चढणे शक्य नाही हे लक्षात आल्यावर प्रकाश आंबेडकरांनी'वंचित बहुजन आघाडी'स्थापन करण्याचा निर्णय पाच वर्षांपूर्वी घेतला होता. तेंव्हा या नव्या ओळखीसहआंबेडकरांनीअसदुद्दीन ओवैसी यांच्या 'एमआयएम'ला सोबत घेत २०१९ ची लोकसभा लढवली होती. सोबतच जवळपास १०० छोटे पक्ष आणि सामाजिक संघटना या आघाडीत सहभागी झाल्या होत्या. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रत्येक जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीच्या लाखोंच्या 'रेकॉर्ड ब्रेक' सभा झाल्या होत्या. आंबेडकरांना राजकारणात यशाचा हाच उत्तम फॉर्म्युला असल्याचं लक्षात आलं अन त्यांनी वंचितच्या स्थापनेवर शिक्कामोर्तब केलं.'अकोला पॅटर्न'च्या सर्वव्यापी प्रयोगाची पुण्याई सोबत असतांनाही 'रिपब्लीकन' शब्दामूळे एकाच वर्गसमुहाचं नेतृत्व म्हणून मारला जाणारा शिक्का त्यांना नको होता. त्यांना 'बहूजन हृदयसम्राट' अशी नवी ओळख दृढ करायची होती. म्हणूनच सर्वव्यापी नेतृत्वाची गुरूकिल्ली ठरू पाहणारं 'वंचित बहूजन आघाडी' या राजकीय नावानं आंबेडकरांना भुरळ घातली असावी. त्यामूळेच आपली 'भारिप-बमसं' या जून्या नावाचा इतिहास कवटाळत न बसता आंबेडकरांनी 'वंचित'च्या माध्यमातून आपलं राजकीय 'भविष्य' सुधारण्याचा प्रयत्नांच एक पाऊल या माध्यमातून टाकलं होतं.आंबेडकरांनी या निर्णयातून आपल्या राजकीय कक्षा, क्षितीजं रूंदावण्याचा प्रयत्न केला आहे. आंबेडकरांच्या नावामागे 'आंबेडकर' नावाचा ब्रँड, विचार अन वारसा असतांनाही त्यांना राजकारणानं सत्तेतील नेमक्या चाब्यांपासून कायम 'वंचित'च ठेवलं आहे. पाच वर्षांपूर्वीच्या या नव्या आघाडीमूळं हे 'वंचित'पण काहीसं दूर होऊन 'बहूजन हिताय, बहूजन सुखाय' अशी आंबेडकरांची या निर्णयामागची दुरदृष्टी होती असं मानलं जातं.लोकसभा निवडणुकीपाठोपाठ राज्याच्या विधानसभा निवडणुकीतही वंचित बहुजन आघाडीचा फटका काँग्रेस-राष्ट्रवादीच्या आघाडीला बसला होता. वंचितनं २०१९ मध्ये राज्यात विधानसभेच्या २३६ जागा लढवल्या होत्या. राज्यातील २८८ मतदारसंघापैकी ३२ जागांवर वंचितमुळे काँग्रेस राष्ट्रवादीचे उमेदवार पडले होते. तेंव्हा काँग्रेस-राष्ट्रवादीला अपेक्षित यश मिळाले असले तरी ३२ जागांवर काँग्रेस-राष्ट्रवादी उमेदवार अगदी थोड्या फरकाने पराभूत झाले होते. लोकसभेपेक्षा वंचितचा मतांचा टक्का मात्र, विधानसभेत घसरला होता. २०१९ विधानसभेत वंचितला एकूण २५ लाख १३ हजार ५८३ मतं मिळाली होती. ही टक्केवारी एकूण झालेल्या मतदानाच्या ४.५८ टक्के इतकी होती.गेल्या अनेक दिवसांपासून राज्याच्या राजकीय वर्तुळात सर्वाधिक चर्चेत असलेला प्रश्न म्हणजे आंबेडकरांचा राज्यात 'महाविकास आघाडी' आणि देशपातळीवर 'इंडिया आघाडी'त प्रवेश कधी होणार?. आंबेडकर सध्या या दोन्ही आघाड्यांचा घटकपक्ष असलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेचा मित्रपक्ष. दोन्ही पक्षांनी २०२३ मध्ये 'शिवशक्ती-भिमशक्ती'चा नारा देत नव्या राजकीय मैत्रीची घोषणा केली होती. उद्धव ठाकरेनी आंबेडकरांना या। आघाडीत घेण्यासाठी अनेकदा जोरदार प्रयत्नही केलेत. आता शरद पवारही या नव्या मैत्रीसाठी तयार झालेत. मात्र, काँग्रेसने अद्याप त्यांच्या हातात मैत्रीचा हात दिलेला नाही. वंचित राज्यात 'महाविकास आघाडी'चा घटक झाला तर याचे सध्याच्या राजकारणावर दुरोगामी परिणाम होणार आहेत. त्या प्रवेशावर या महिन्याच्या शेवटी निर्णय होण्याची शक्यता आहे.२०२४ मध्ये सत्तेत जाण्याचा नारा प्रकाश आंबेडकरांनी दिला आहे. लोकशाहीत कोणत्याही प्रयोगासोबतच महत्व आहे ते आकड्यांना. प्रकाश आंबेडकरांच्या राजकीय कारकिर्दीत फक्त काँग्रेससोबतचा सत्तेत सहभागाचा १९९९ ते २००४ चा अपवाद सोडला तर कायम सत्तेच्या प्रवाहाबाहेर रहावं लागलं. अकोल्यात जिल्हा परिषद आणि काही पंचायत समित्यांच्य अपवाद सोडला तर येथेही पक्ष विरोधी पक्षाच्या भूमिकेत राहिला आहे. त्यामूळे प्रकाश आंबेडकरांना आपलं राजकारण आणि चळवळ पुढे नेण्याकरिता राज्यकर्ती' जमात व्हा!, हा डॉ. बाबासाहेबांचा मंत्र अंगीकारावा लागणार आहे. सध्याच्या राजकारणात 'सत्ते'त जाण्यासाठी बाळासाहेब आंबेडकर कोणते प्रयत्न करतात?. यासोबतच या प्रयत्नांना मतदार यश देतात का?, याचं उत्तर २०२४ हे वर्ष देणार. त्यामूळे घोडामैदान जवळच आहे, या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळण्यासाठी....

# सहकार विभागातील 'जी.डी.सी. अॅन्ड अे' परीक्षा वेळापत्रक जाहीर

## परीक्षेचा कालावधी २४ ते २६ मे दरम्यान

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक,** अमरावतीसहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी.डी.सी. ण्ड अे बोर्ड) मार्फत घेण्यात येणारी शासकीय सहकार व लेखा पदविका मंडळ (जी.डी.सी. ण्ड अे) व सहकार गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र सी.एच.एम परीक्षा दि. २४,२५ आणि २६ मे २०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. यासाठी पात्र उमेदवारांनी दि. १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी केले आहे.

ऑनलाईन अर्ज करण्याबाबत सविस्तर सुचना खात्याच्या वेबसाईट https:gdca.maharashtra.gov.in व र्हीींिि:रिहरज्ञरीर्ीूज्ञूर.ारहरीरीहीींर.से.ळप या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. ऑनलाईन लिकेशन व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे या परीक्षेसाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. ऑनलाईन अर्ज करताना तयार केलेला स्वत:चा यूजर आयडी व पासवर्ड परीक्षार्थींनी जतन करून ठेवावा. तसेच सन २०२३ चे परीक्षाचा निकाल संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

### परीक्षेचे वेळापत्रक याप्रमाणे

शुक्रवार, दि. २४ मे रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत सहकारी गृहनिर्माण संस्थांचे व्यवस्थापन व दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत जमाखर्च.शनिवार, २५ मे रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत लेखापरिक्षण व दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत सहकाराचा इतिहास, तत्वे, व्यवस्थापन.रविवार, दि. २६ मे रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत सहकार कायदा, इतर कायदे व दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत सहकारी बॅंक, संस्था व इतर वित्तीय संस्था.

## खनिकर्म विभाग; ई-निवीदेस २३ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तलई ता. धारणी, व तळणी पूर्णा ता. चांदूरबाजार तालुक्यातील नदीपात्रातील गाळ व गाळ मिश्रीत वाळू, वाळूडेपोपर्यंत वाहतुक व डेपो अॅड तसेच व्यवस्थापन करण्यासाठी ई-निवीदा मागविण्यात आली होती. या ई-निविदा सूचनेला मंगळवार दि. २३ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी इम्रान शेख यांनी दिली आहे. अमरावती जिल्ह्यात पुरपरिस्थिती निर्माण होणाऱ्या तलई ता. धारणी व तळणी पूर्णा ता. चांदूरबाजार तालुक्यातील नदीपात्रातील स्थळांतुन गाळ व गाळ मिश्रीत वाळूची, वाळूडेपो पर्यंत वाहतुक करणे व डेपो निर्मिती तसेच व्यवस्थापन करण्यासाठी ई-निवीदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. निवीदा स्विकारण्याची अंतिम दि. ४ जानेवारीपर्यंत होती. त्यानुसार १० वाळू डेपोंपैकी मौजे तलई ता. धारणी व मौजे तळणी पूर्णा ता. चांदुरबाजार येथे ३ किंवा त्यापेक्षा जास्त निवीदा प्राप्त झालेल्या नाहित. उर्वरित ८ वाळूडेपोंकरिता निवीदा प्राप्त झालेल्या नाहित. सदर ई-निवीदेस दि. २३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

# रस्ता सुरक्षा अभियान २०२४: रस्ते सुरक्षेची सवय ही स्वयंप्रेरणेने व्हावी - अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे






**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** रस्ता सुरक्षा नियम हे सप्ताहापुरती बाळगावयाची बाब नसून ते स्वयंप्रेरणेने आयुष्यभरासाठी अंगीकाराला हवी. तसेच आपल्या निष्काळजीपणाने अपघातास निमित्त होणार नाही, याची दक्षता घेणे प्रत्येकांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे यांनी आज येथे केले.




रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक सुभाष ढोले, प्रादेशिक परिवहन अधिकारी राजाभाऊ ठाकरे, सहायक पोलिस आयुक्त मनिष ठाकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत म्हैत्रे, जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर, विजय गावंडे, प्रदीप गुडदे तसेच अधिकारी कर्मचारी व शिकाऊ अनुज्ञप्तीधारक, वाहन चालक उपस्थित होते.श्री. वाघमारे म्हणाले की, रस्ते सुरक्षा ही अत्यंत महत्त्वाचे असून रस्ता सुरक्षा नियमाची माहिती व त्याचे तंतोतत पालन होणे आवश्यक आहे. रस्ते अपघातात दुचाकीस्वारांचे प्रमाण अधिक असते, त्यातही डोक्याला मार लागुन होणाऱ्या मृत्युंची संख्या जास्त असते. त्यामुळे हेल्मेटचा वापर हा अत्यंत आवश्यक आहे. तसेच वाहनचालकांची आरोग्य तपासणी जेवढी महत्वाची आहे तेवढीच वाहनाची वेळोवेळी काळजी घेणे महत्वाची आहे. वाहन चालवतांनी वेळेचे नियोजन, सौजन्यता व संयम बाळगने या बाबीचे पालन केल्यास जीवित व वित्तहानी टाळल्या जावू शकतात. यासाठी शालेय स्तरावर जनजागृती मोहिम नियमित राबवावी. तसेच प्रत्येकांनी रस्ते सुरक्षा नियमाचे स्वयंप्रेरणेने पालन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री ठाकरे म्हणाले की, सद्यास्थितीत वाहनाच्या संख्येत प्रचंड वाढ होत असून रस्तावर गर्दी होत आहे. रस्ते सुरक्षा ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असून प्रत्येकाने नियमाचे पालन करणे गरजेचे आहे. आपण दैनंदिन जीवनात वाहन चालवितांना अनेक प्रकारे निष्काळजीपणा करुन स्वत:चा व अन्य व्यक्तिंचा जीव धोक्यात घालत असतो, हे अत्यंत धोकेदायक असून अपघातातील अकस्मात मृत्यूंमुळे कुटुंब व समाजावरही परिणाम होतो. त्यामुळे वाहन चालविताना हेल्मेट, वाहन विमा, वाहनाची तपासणी करावी. तसेच आधुनिक तंत्र व पच्या वापर करावा. शासन मान्यता प्राप्त डिजी लॉकर पमुळे आवश्यक कागदपत्रे बाळगाची आवश्यक नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रस्ता सुरक्षा अभियानामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत म्हैत्रे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे व सहायक पोलिस आयुक्त मनिष ठाकरे यांनी रस्ते संदर्भातील कायदे व नियम, वाहन चालविण्याचे कौशल्य, वाहन चालवितानी घ्यावयाची काळजी, हिट अँड रन कायद्याची माहिती व अपघात झाल्यावर करावयाचे उपाययोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आले. त्यानंतर माहिती पत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अपघात विरहित सेवा दिल्याबद्दल एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे सत्कार करण्यात आले. वाहन निरिक्षक कांचन जाधव यांनी प्रास्ताविकेतून रस्ते सुरक्षा अभियानाचे आयोजनामागील भुमिका व जिल्ह्यातील अपघात स्थितीबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी दौड यांनी तर आभार श्वेता वैद्य यांनी मानले.




## वजन कमी करायचं मग 'हे' डाएट करून पाहा, व्हॉल्यूम डाएट काय आहे?

दि.१७विदर्भ प्रजासत्ताक

सध्यावाढलेलं वजन आणिलठ्ठपणा ही अनेकांची समस्या असल्याचं दिसून येत आहे. वजन कमी करण्यासाठी काही जण व्यायाम करतात, काही जणडाएट करतात, तर जण या दोन्हींची मदत घेऊन वजन कमी करण्याचा प्रयत्न करतात. तुम्हालाही वजन कमी करण्यासाठी काहीसा सोपा मार्ग हवा असेल तर ही बातमी वाचा.वजन कमी करायचं मग 'हे' डाएट करून पाहावजन कमी करण्यासाठी डाएट करायचं म्हटलं की, जीभेचे चोचले पुरवता येत नाही. जंक फूट, जास्त कॅलरी असलेले अन्नही खाता येत नाही आणि यामुळे पोटभर जेवताही येत नाही. पण आज आम्ही तुम्हाला डाएटिंगचा एक असा पर्याय सांगणार आहोत. ज्यामध्ये तुम्ही भरपूर खाऊ शकता, पण तुम्हाला फक्त एका गोष्टीची काळजी घ्यावी लागेल. डाएटिंगचा सोपा पर्याय म्हणजे व्हॉल्यूम डाएट, , याबाबत सविस्तर माहिती वाचा.व्हॉल्यूम डाएट म्हणजे काय?व्हॉल्यूम डाएट किंवा व्हॉल्यूम इटिंगमध्ये कमी कॅलरी असलेले अन्न जास्त प्रमाणात खाण्यावर लक्ष केंद्रित केलं जातं. तज्ज्ञांच्या मते, व्हॉल्यूम इटिंग खाण्यामागील कल्पना अशी आहे की, जास्त प्रमाणात अन्न घेतल्याने तुम्हाला पोट भरते. सोप्या भाषेत, या डाएटिंगमध्ये भरपूर खायला मिळतं, पण कमी कॅलरी असणारं अन्न खाण्याला प्राधान्य दिलं जातं.व्हॉल्यूम डाएटचे फायदेवजन कमी करण्यास मदत होते.तुम्ही भरपूर खाऊ शकता.खाताना लठ्ठपणाची काळजी करण्याची गरज नाही.पोट भरते, त्यामुळे भूक कमी लागते.फायबरयुक्त आहार घेतल्यास जास्त खाण्याची समस्या हळूहळू दूर होते.पचनसंस्था निरोगी राहते.चयापचय



क्रिया मजबूत होते.या डाएटमुळे ऊर्जाही मिळते.व्हॉल्यूम डाएटमध्ये कोणते पदार्थ खावेत?कलिंगडखरबूजद्राक्षेपीचलिंबूवर्गीय फळेकाकडी, कोबी यासारख्या भाज्यांपासून तयार केलेलं सॅलडअंड्याचा पांढरा भागओट्सफळेहंगामी भाज्याकडधान्येनट्सकमी चरबीयुक्त पदार्थकमी चरबीयुक्त आणि कमी कॅलरीयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा. हिरव्या पालेभाज्यांमधून आपल्याला फायबर, फोलेट, जीवनसत्त्वे, खनिजे आणि लोह मिळते. लाइकोपीन आणि फायटोकेमिकल्सने समृद्ध असलेल्या हिरव्या भाज्या वजन कमी करण्यासोबतच शरीराची प्रतिकारशक्तीही वाढवतात.-

# काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला यांची १८ ला निवडणुकांच्या पार्श्वभुमिवर विभागीय बैठक

## प्रमुख पदाधिकाऱ्यांची राहणार उपस्थिती



**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** काँग्रेस पक्षाचे राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत काँग्रेस भवन येथे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभुमिवर १८ जानेवारी रोजी विभागीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीदरम्यान जिल्हानिहाय आढावा घेतल्या जाणार असुन विभागातील प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार असल्याची माहिती पत्रकार परिषद दरम्यान जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिली.

काँग्रस भवन येथे सकाळी १० वाजतापासुन बैठकीला सुरूवात होणार आहे. या बैठकीत राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्यासह बाळासाहेब थोरात,अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार, माजीमंत्री आ.यशोमती ठाकूर, प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील, अमरावती विभाग प्रभारी, माणिकराव ठाकरे, शिवाजी मोघे, प्रा. वसंत पुरके, डॉ. सुनिल देशमुख, संध्या सव्वालाखे तसेच विभागातील सर्व जिल्हा काँग्रेस कमिट्यांच्या प्रमुख उपस्थित राहणार आहे. या बैठकीचे दोन सत्रात आयोजन केलेले आहे. पहील्या सत्रात जिल्हानिहाय आढावा होईल यामध्ये सकाळी १० वाजता अमरावती शहर आणि ग्रामिण, ११ वाजता अकोला शहर व ग्रामिण, ११.४५ वाजता यवतमाळ, १२.३० वाजता वाशिम व दुपारी १.१५ वाजता बुलढाणा जिल्ह्याचा आढावा घेतल्या जाणार आहे.दुसऱ्या सत्रात सर्वच जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची सयुक्त बैठक होणार आहे. बुथ लेव्हल एजंटस, संघटनात्मक तसेच आगामी लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा होणार असल्याची माहीती जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांनी दिली. पत्रकार परिषदेला माजीमंत्री आ. यशोमती ठाकुर,जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख, आ. बळवंत वानखडे, माजी आमदार विरेंद्र जगताप, हरीभाऊ मोहोड, मिलिंद चिमोटे, प्रविण मनोहर, पंकज मोरे यांची उपस्थिती होती.

## महानगरपालिका आयुक्त देविदास पवार यांच्या संकल्पनेतून

# महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा महोत्सवअंतर्गत क्रिकेट व व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न






**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अमरावती महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा महोत्सवाअंतर्गत क्रिकेट व व्हॉलीबॉल स्पर्धा मा.आयुक्त देविदास पवार यांच्या संकल्पनेतून अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये प्रथमच (क्रिकेट व व्हॉलीबॉल) क्रीडा स्पर्धा शनिवार दिनांक १३ व रविवार दिनांक १४ जानेवारी,२०२४ या दोन दिवसामध्ये पार पडल्या. क्रिकेट नरसम्मा महाविद्यालय किरण नगर अमरावती व व्हॉलीबॉल स्पर्धा अंबापेठ क्रीडा मंडळ अमरावती येथे यशस्वीरित्या पार पडल्या. क्रिकेट व व्हॉलीबॉल स्पर्धेचे उदघाटन मा.आयुक्त देविदास पवार यांचे हस्ते संपन्न झाले. क्रिकेट चे उदघाटन मॅच बाजार परवाना विभाग व मुख्यालय सामान्य प्रशासन विभाग या दोन संघामध्ये सामना पार पडला. हा सामना बघण्याकरीता मा.आयुक्त साहेब हे प्रेक्षक म्हणून उपस्थित होते. तसेच हॉलीबॉलचे सामने अंबापेठ क्रीडा मंडळावर घेण्यात आले.

त्याकरीता उदघाटक म्हणून मा.आयुक्त महोदय यांच्या हस्ते उदघाटन करुन उदघाटन मॅच शिक्षक – टिम व बडनेरा झोन क्र.४ या दोन संघामध्ये सामना पार पडला. या सामना बघण्याकरीता मा.आयुक्त देविदास पवार, मा.सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, मा.शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम यांच्या उपस्थितीमध्ये व्हॉलीबॉल सामन्याचा आनंद घेण्यात आला. त्यानंतर पुढील सामने घेण्यात आले. रविवार दिनांक १४ जानेवारी,२०२४ ला क्रिकेट व हॉलीबॉलचे सेमीफायनल फायनल घेण्यात आले. यामध्ये क्रिकेटमध्ये शिक्षक – टिम वि. झोन क्र.५ भाजीबाजार यांच्यामध्ये फायनलचा सामना पार पडला.

या अतिशय चुरशीच्या सामन्यामध्ये शिक्षक – टिम ने फायनलमध्ये प्रथम पुरस्कार पटकाविला व झोन क्र.५ भाजीबाजार या टिम ने दुसरा पुरस्कार पटकाविला तसेच व्हॉलीबॉल या सामन्यामध्ये शिक्षक इ टिम ने फायनलमध्ये प्रथम पुरस्कार पटकाविला व दुसरा पुरस्कार झोन क्र.४ बडनेरा या टिम ने पटकाविला. अतिशय उत्साहात व खेळी मेळीच्या वातावरणात अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेमध्ये शिक्षण व क्रीडा विभागाच्या सहकार्याने क्रीडा महोत्सव व्यवस्थितरित्या पार पडल्या व यामध्ये सर्वाचे सहकार्याने सामना पार पडल्या. सदर विभागाने यामध्ये अतिशय मेहनत घेतली. या स्पर्धेमध्ये वहीद सर, कांबळे सर, सपकाळ सर, राणे सर, बेलसरे सर, वानखडे सर, काझी सर, कुलट सर, सुने मॅडम, नंदु पवार, बारांगोळे, अमित, मयुर यांनी अथक परिश्रम घेतले.

# मठाधिपती ज्ञानेश्वर महाराज माऊली यांना श्रीराम जन्मभुमि तिर्थक्षेत्र अयोधेचे महासचिव चम्पत राय यांचे निमंत्रण




**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** दि. २२ जानेवारी २०२४ रोजी संपूर्ण भारत वर्षाचे आराध्य दैवत असलेले प्रभु रातचंद्राच्या मुर्तीची प्रतिष्ठापना होत असुन या प्रतिष्ठापना कार्यक्रमासाठी विविध राज्यांमध्ये असलेल्या मठामधील मठाधिपतींना निमंत्रण मिळाले असुन त्या अनुषंगाने रामयण रचीयता आध्यकवी महर्षी वाल्मीकी मठ सामदा काशिपूर येथील ३१ वे मठाधिपती माऊली ज्ञानेश्वर महाराज यांना सुध्दा अयोध्या श्रीराम जन्मभुमि समितीचे महासचिव चम्पत राय यांच्याकडून कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले आहे. त्यानुसार मठाधिपती माऊली ज्ञानेश्वर महाराज हे सुध्दा दि. १७ जानेवारी २०२४ सामदा येथून रथयात्रे व्दारे अयोध्येकडे मार्गक्रम करणार आहेत. या रथयात्रेचा स्वागता निमित्य अमरावती जिल्हयात ठिकठिकाणी महाराजांच्या पुजनाचा व स्वागताचा कार्यक्रम आयोजित केला आहे.



विशेत: महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव समितीच्या वतीने उमेश ढोणे, एकनाथ वावरे, प्रकाश दंदे व असंख्य पदाधिकाऱ्यांनी प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी, अयोध्या धामचे प्रमुख नृत्त गोपालदास महंत यांना महर्षी वाल्मिकी यांची किर्ती विश्वात राहावी या हेतुने त्यांचे नाव दयावे ही मागणी पुर्ण करत अयोध्या येथे महर्षी वाल्मिकी अंतरराष्ट्रीय विमानतळ असे दिले. व त्याचे उदघाटन मा. प्रधानमंत्री यांनी केले ही अतिशय आनंददायी क्षण असुन हे महत्व लक्षात घेता महर्षी वाल्मिकी मठाचे मठाधिपती माऊली ज्ञानेश्वर महाराज अयोधेकडे मार्गक्रम करणार.

मोठया भाविक भक्तगणांना स्वागतासाठी उपस्थित राहावे. असे आव्हाण समितीव्दारे करण्यात आले.

# भाववाढीच्या प्रतीक्षेत अजूनही घरामध्येच पडून आहे पांढरे सोन ; शेतकरी हवालदिल

## पैशांच्या गरजेपोटी शेतकरी मिळेल त्या भावात कापूस विकतात

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर –** नगदी पिक म्हणून तालुक्यातील शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात कपाशीची लागवड करतो.यंदा मात्र कपाशीच्या भावात अपेक्षित वाढ होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या घरात पहिल्या वेचणीचा शेकडो क्विंटल कापुस तसाच पडून असल्याने शेतकरी चिंतातुर झाले आहेत. अनेक शेतकरी पैशाची निंतात गरज असल्याने मिळेल त्या भावात खाजगी व्यापाऱ्यांकडे कापसाची विक्री करु लागले आहे.सुरूवातीला ७ हजार ४०० रूपये प्रतिक्विंटलने खरेदी करण्यात येत असलेला कापूस सध्या ६ हजार ६०० ते ७ हजार रुपयावर येऊन ठेपला आहे. दर्यापूर तालुक्यात यावर्षी निसर्गाचा असमतोल राहीला आहे. त्यामुळे खरिपातील पिकाचे मोठे नुकसान झाले हे वास्तव आहे.अशाही परिस्थितीत शेतकऱ्यांनी ४८ हजार ७३६ हेक्टरवर कपाशीची लागवड शेतकऱ्यांनी केली होती. परंतु कपाशीच्या पिकाला ऐन पाते व बोडे लागण्याच्या काळातच पावसाने मोठा खंड



दिला.त्यामुळे कपाशीला मोठा फटका बसला. काही मोजक्या शेतकऱ्यांनी तुषार सिंचन द्वारे पाणी देत कपाशी पिकाची घडी बसवून पिक हातात आणले. सध्या मागील दोन महिन्यापासून कापूस वेचणीला सुरूवात झाली आहे. विशेष म्हणजे शेतकरी शेजारील राज्यातून मजुर आणुन त्यांना १० ते १२ रुपये किलो मजुरी देऊन कापूस वेचुन घरी आणण्याचा प्रयत्न करीत आहे. कपाशीवर लावलेला खर्च कापुस भाववाढीतुन मिळेल या शेतकऱ्यांनी घरात कापूस साठवून ठेवला आहे. जवळजवळ दिवाळीपासुन कापुस शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. सुरूवातीला ७ हजार ४०० रुपयाने कापुस खरेदी सुरूवात झाली. आता मात्र दोन महीन्यानंपासून ४०० रुपयाची घसरण झाल्याचे व्यापारी व शेतकरी सांगत आहे.भाव वाढतील किंवा नाही वाढतील मात्र शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचे ओझे वाडत असल्याने ग्रामीण भागातील अनेक शेतकरी मिळेल त्या भावात कापूस विकत आहेत.कापुस विक्री करु लागले आहे.तर काही शेतकरी आजही भाववाढीच्या प्रतिक्षेत आहेत, ज्या शेतकऱ्यांकडे कापुस साचुन आहे असे शेतकरी आता हवालदील झाले आहे.अनेक शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांची खुशामत करुन कापुस देण्यास सुरूवात केली आहे.व्यापारी देखील हाच फायदा उचलत बेभाव कापसाची खरेदी करु लागले असे चित्र दिसत आहे.

> शेतकऱ्याच्या घरात कापुस आल्यावर भावात घसरण झाली त्यामुळे कपाशी पीकाला लावलेला खर्चही निघणे शक्य नाही. शासनाकडून घोषणांचा पाऊस पडतो खरा पण प्रत्यक्षात शेतकऱ्याला काहीच मीळत नाही. यावर्षी शेती तोट्यात आली आहे. शेतकऱ्यांना कुणीच वाली नाही हेच वास्तव आहे.
>
> **– श्रीजीत ठाकरे, शेतकरी गोळेगाव**

> सर्वाधिक पेरा असलेल्या कपाशीचे डीसेंबरमधील अवकाळी पावसाच्या तडाख्याने काही प्रमाणात नुकसान झाले. वेचणीचा अतीरिक्त खर्च, आता कापसाला चांगला भाव नाही. एकंदरीत शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. शासनाने शेतकऱ्यांना सरसगट आर्थिक मदत देण्याची गरज आहे.
>
> **– शंकरराव गुल्हाने, शेतकरी दर्यापूर**

# बहिरम यात्रेमध्ये प्रथमच कुस्ती स्पर्धा

## सोलापूर येथील एकनाथ बेंद्रेने जिंकली चांदीची गदा



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक बहीरम** महाराष्ट्र–मध्य प्रदेश सीमेवर आयोजित बहिरम यात्रेत प्रथमच मैदानी मातीवरील कुस्तीचे सामने रंगले. सोलापूर येथील एकनाथ बेंद्रेने प्रतिस्पर्ध्याला चितपट करीत चांदीची गदा जिंकली.

बहिरम यात्रेमध्ये प्रथमच मैदानी मातीवरील कुस्तीचे सामने नमो चषक २०२४ अंतर्गत भाजयुमो, सियाराम हेल्थ क्लब (चांदूर बाजार) व अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. कुस्ती हौदाचे व चांदीच्या गदेचे पूजन भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब सोनार यांच्या हस्ते झाले. राज्यभरातील विविध वयोगटातील ६० सामने यामध्ये झाले. विजयी पहिलवानांना तत्काळ रोख बक्षीस वितरण करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

खा. नवनीत राणा व खा. अनिल बोंडे यांच्या उपस्थितीत शेवटची लढत सोलापूर येथील एकनाथ बेंद्रे यानेजिंकली. त्याला चांदीची गदा व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. कुस्ती सामन्यांसाठी संजय तीरथकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. याप्रसंगी भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य प्रमोद कोरडे, नगरसेवक गोपाल तीरमारे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर रसे, प्रवीण तायडे, मनोहर सुने, प्रणीत खवले, मुरली माकोडे, नंदकिशोर वासनकर, मिलिंद चुके, रमेश तायवाडे, वैभव मनवर, अनिल वाट यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.बहिरम येथील या कुस्ती स्पर्धेतराज्यातील विविध जिल्ह्यातील दिग्गज कुस्तीपटू सहभागी झाले होते. त्यामुळे ही स्पर्धक रंगतदार झाली.

# तिवसा मतदार संघात आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांचा विकास कामांचा धडाका

**दि१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** माजी महिला बालविकास मंत्री आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी तिवसा मतदारसंघात विकास कामांचा धडाका सुरू केला आहे. आमदार ठाकूर यांच्या हस्ते तिवसा मतदारसंघातील विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि शुभारंभ करण्यात आला.अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदार संघाच्या कार्यतत्पर आमदार एडवोकेट यशोमती ठाकूर यांनी सोमवारी तिवसा मतदार संघात अनेक विकास कामांचा शुभारंभ केला. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तिवसा तालुक्यातील गुरुदेव नगर येथे माळेगाव बांधकाम रस्ता ते गुरुदेव नगर पर्यंत २४ लाख रुपयांच्या पांधण रस्त्याच्या काम सुरू केले. तसेच याच योजनेअंतर्गत गुरुदेव नगर ते नांदुरा या पांधन रस्त्याचे २४ लाख रुपयांच्या कामाचा शुभारंभ केला. मोझरी येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मोजणी ते आठवडा पांधन रस्ता मोझरी ते शेंदुर्जना बाजार ग्रामीण मार्ग क्रमांक ११३ रस्त्यावर मोरीचे बांधकाम करण्यासाठी वीस लाख रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. तसेच मोझरी ते शेंदूरजना बाजार ग्रामीण मार्ग क्रमांक ११३ रस्त्यावर रस्त्याची सुधारणा करण्यासाठी २५ लाख रुपयांच्या कामाचाही यावेळी शुभारंभ करण्यात आला. तीवसा येथे तिवसा ते कालवा म्हणजेच



स्मशानभूमीपासून कालव्यापर्यंत पाधन रस्ता, तिवसा ते तळेगाव म्हणजेच मटन मार्केट ते कालव्यापर्यंत पांधन रस्ता कामाचा शुभारंभ करण्यात आला. या दोन्ही कामासाठी प्रत्येकी २४ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तर तिवसा नगरपंचायत हद्दीमध्ये अद्ययावत सांस्कृतिक भवनाचे बांधकाम करण्यासाठी ३० लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भारवाडी ते तिवसा म्हणजेच शेषराव आढाउ ते भोजराज लादे यांच्या शेतापर्यंत पांधण रस्ता करण्यासाठी २४ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तर भारवाडी नवीन ते वरखेड पर्यंतच्या शेतात पांधन रस्ता बांधण्यासाठी २४ लाख रुपये मंजूर करण्यात आले असून या दोन्ही कामांचा ड. ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. तर ममदापूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णसेवेसाठी डॉक्टरांच्या उपस्थित शुभारंभ करण्यात आला. तीवसा तालुक्यातील जावरा येथे राज्य महामार्ग ३०० ते दापोली तसेच जावरा गोदरी काटसुर ते राष्ट्रीय महामार्ग पर्यंतच्या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी ३० लाख रुपये निधी मंजूर करून आणण्यात आला होता. या कामांचेही आमदार ड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला आहे.यावेळी नरेंद्र वाकोडे मृणाल मेश्राम, कांचन भोयर, गौरव ढोरे, निखिल चौधरी, दीपक पा, भोजराज लादे, शंतनू राऊत ,सुरेंद्र कराळे आणि रतन बावनकर आदी मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३२ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या, ३० नव्याने दाखल

## गोपाल उंबरकर, सुरेंद्र बेलखडे, हेमंत ठाकरेंचा समावेश





**दि.१७विदर्भ प्रजासत्ताकअमरावती :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पत्रावरून पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू झाली आहे. या क्रमवारीत जिल्ह्यातील ग्रामीण पोलिसांच्या ३२ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या, तर ३० नवीन पोलिस अधिकाऱ्यांची अमरावती जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे.

अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. त्सेरिंग दोरजे यांच्या आदेशानुसार या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये ग्रामीण क्षेत्रातील तीन पोलिस निरीक्षक, १५ सहायक पोलिस निरीक्षक व १४ पोलिस उपनिरीक्षकांचा समावेश आहे. जिल्ह्यातून बदली झालेल्या पोलिस निरीक्षकांमध्ये गोपाल उंबरकर यांचीयवतमाळ जिल्ह्यात, सुरेंद्र बेलखडे यांची अकोला, तर हेमंत ठाकरे यांची बुलढाणा येथे बदली करण्यात आली आहे. प्रशांत मसराम, सुरेश म्हस्के, प्रदीप शिरस्कर आणि नितीन देशमुख हे चार नवे पोलिस निरीक्षक आहेत. सहायक पोलिस निरीक्षकांमध्ये स्वप्नील ठाकरे, विनायक लांबे, मिलिंद च सरकटे, सूरज तेलगोटे, पंकज दाभाडे,विशाल पोलकर, प्रवीण वेरूळकर, प्रकाश तायडे, सारिका राऊत, वर्षा खरसान या सर्वांची यवतमाळ जिल्ह्यात बदली झालेली आहे. नरेंद्र पेंदोर, ईश्वर वर्गे, आशिष चेंचरे, गीता तांगडे यांची बुलढाणा येथे, तर चंद्रकला मेसरे यांची अकोला जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे.

अमरावती जिल्ह्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये स्वप्निल निराळे, नीलेश गोपाळचावडीकर, राजीव हाके, भरत चपाईटकर, सतीश खंडेकर, श्रीकांत कडू, अभय चौथनकर, किशोर वानखडे, सागर भासकर, राहुल जंजाळ, प्रशांत जाधव आहेत. जिल्ह्यातून बदली झालेल्या १४ पोलिस उपनिरीक्षकांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे मोहम्मद तस्लीम, अश्विनी रायबोले, प्रदीप चव्हाण, संजय उदासी, राजू इंगळे, प्रतिभा मेश्राम, शुद्धोधन नितनवरे, राजकुमार मोहोड, धीरज राजूरकर,अनिक कविटकर, संजय कोहळे, वसंत शिंदे यांचा समावेश आहे.

# जिल्हाधिकारी : २४ तासांच्या आत उत्तर देण्याचे आदेश

## चिखलदराच्या मुख्याधिकाऱ्यांना 'शो कॉज'



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताकचिखलदरा –** चिखलदरा नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुधाकर पानझाडे यांनी आपल्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असून, नियमबाह्य केलेल्या कामांची तक्रार आमदार राजकुमार पटेल यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्यानंतर त्याची दखल घेत २४ तासांच्या आत स्पष्टीकरण देण्याचे आदेश कारणे दाखवा नोटीस बजावत देण्यात आले आहे. पालिकेतील भ्रष्टाचाराचा पाढा आता नागरिकही वाचू लागले आहेत. चिनगर परिषदेचे मुख्याधिकारी सुधाकर पानझाडे यांनी आपल्या गे सेवानिवृत्तीला केवळ पंधरा दिवस ले अवधी असल्याने मोठ्या प्रमाणात डा नियमबाह्य कामांचा धडाका लावल्याची तक्रार आ. राजकुमार पटेल यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सोमवारीप्रत्यक्ष भेट देऊन लेखी स्वरूपात तक्रारीद्वारे केली होती, कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांकरिता निधी खर्च होत आहे. प्रशासनाकडून कामे केली जात असताना त्यामध्ये होत असलेला गैरप्रकार पुढे आला आहे.

कोरोनेशन पार्कमध्ये प्रचंड अनियमितता, नियमबाह्यरीत्या दिलेले बाल उद्यान, निविदा प्रक्रिया सोडून सातपुडा हॉटेल पाच हजार रुपये रोज दराने चालविण्यास देणे, या आणि इतर कामांची तक्रार करण्यात आली होती.

> मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांच्या तक्रारीवरून चिखलदरा मुख्याधिकाऱ्यांना २४ तासांच्या आत लेखी उत्तर सादर करण्याचे आदेश कारणे दाखवा नोटीस बजावून देण्यात आले आहेत.
> – **सुमेध अलोने**, सहायक आयुक्त नगर पालिका प्रशासन

## राष्ट्रीय शालेय स्कवॉश क्रिडा स्पर्धत तनिष मालठाणे व आयुष येरणेला रजत पदक




**दि.१७विदर्भ प्रजासत्ताकअमरावती ;** पुणे येथे ६७ व्या राष्ट्रीय शालेय स्तरावरील स्कवॉश क्रिडा स्पर्धा मोठ्या जल्लोषात दिनांक १० जानेवारी २०२४ ते १३ जानेवारी २०२४ दरम्यान पार पडल्या असून अमरावती येथील तोमई स्कूलचा इयत्ता नवविच्या विद्यार्थी तनिष मालठाणे आणि आयुष येरणे यांनी बाजी मारल रजत पदक पटकाविले आहे. गेल्या महिण्यात झालेल्या राज्य स्तरीय क्रिडा स्पर्धेनंतर महाराष्ट्र संघात सतरा वर्षे वयोगटात यांची निवड झाली होती. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करून अंतीम फेरी गाठत तनिष मालठाणे आणि आयुष येरणे यांनी रजत पदक प्राप्त करून अंबा नगरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पधैकरिता देशपातळीहून विविध राज्याचे खेडाळू, प्रशिक्षक तसेच व्यवस्थापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर स्कुल गेम फेडरेशन ऑफ इंडिया लखनौ आणि महाराष्ट्र राज्याच्या क्रिडा व युवक सेवा संचालणा मार्फत आयोजिल्या होत्या. हे विषेश या दोघांनाही प्रशिक्षक गणेश तांबे यांचे मोलाचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन लाभले असून ते आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक गणेश तांबे व आई-वडिलांना देतात. प्राप्त केलेल्या घवघवित यशा बद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकासह अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लसणाला महागाईचा तडका, प्रतिकिलो ३५० रुपये

### आवक घसरली, नवीन लसूण येण्यास महिनाभराचा वेळ, आठवडाभरापासून दर वाढलेलेच



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** लसणाच्या वाढलेल्या दराने सर्वसामान्यांचे बजेट बिघडवून टाकले आहे. बाजारपेठेत सहा आठवड्यात लसणाच्या किमती दुप्पट झाल्या आहेत. लसणाच्या दराने ३५० रुपये प्रति किलो दराचा टप्पा गाठला आहे. विशेषतः सरासरी घाऊक किंमत ३०० ते ३५० असून, चांगल्या प्रतिच्या लसणाचे भाव चढेच आहेत. बाजारपेठेत आवक कमी असल्याने दरवाढ झाली आहे. लसूण हा किचनमधील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. अन्नपदार्थ स्वादिष्ट होण्यासाठी लसणाचा आहारात दैनंदिन वापर होतो. गत सहा महिन्यांपूर्वी ६० ते ८० रुपये प्रति किलो दराने विकला जाणाऱ्या लसणाने हल्ली ३५० रुपये भाव ओलांडला आहे. वाढत्या महागाईत लसणाने भर घातल्याने फोडणीला तडखा बसल्याचे वास्तव आहे. लसणात प्रोपील डायसल्फाईड आणि लिपीड ही द्रव्ये असतात, असे तज्ञांचे मत आहे. चटणी, भाजी व लोणचे तयार करण्यासाठी गृहिणीकडन लसणचा वापर केला जातो.तसेच लसणाला आयुर्वेदातही स्थान आहे. सर्दी आणि फ्लूच्या विषाणूपासून बचाव करण्यासाठी लसूण रोगप्रतिकारशक्ती वाढवते. साधारणतः दरवर्षी मुलांना सहा ते आठ वेळा सर्दी होते, तर मोठ्यांना चार ते पाच वेळा सर्दी होते. कच्चा लसूण खाल्ल्याने सर्दी, ताप या आजारापासून बचाव करता येतो, असे बालरोग तज्ञ डॉ. हेमंत मुरके यांनी सांगितले. त्यामुळे ग्राहकांनाही नवीन लसूण बाजार येईपर्यंत चढ्या दरानेच लसूण खरेदी करण्याशिवाय पर्याय नाही. परिणामी लसणाची फोडणी महागली अहे. यामुळे मात्र गुहीणीचे बजेट कोलमडले आहे.

> **परराज्यातून लसणाची आवक**
> राज्यात लसणाचे उत्पादन अल्प प्रमाणात घेण्यात येते. त्यामुळे अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत लसूण हे मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, उत्तर प्रदेशातून मागविले जाते. सर्वाधिक उत्पादन हे मध्य प्रदेशात होत असल्याची माहिती आहे.

# जिल्हा कचेरीवर प्रहारद्वारा दशक्रिया

## अवकाळीचे पंचनामे नाहीत; प्रशासनाच्या उदासीन धोरणाचा निषेध




**दि.१७विदर्भ प्रजासत्ताकअमरावती : –** अवकाळी पावसाने नुकसान झाल्यानंतरही महसूल विभागाने तिवसा तालुक्यातील पिकांचे पंचनामे केले नाहीत. त्यामुळे तालुका शासन मदतीपासून वंचित राहिला आहे. याच्या निषेधार्थ प्रहारद्वारा संजय देशमुख यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवारी आत्महत्या केलेल्या वहा येथील शेतकऱ्याची दशक्रिया करून निषेध नोंदविला.

नोव्हेंबरअखेरीस झालेल्या अवकाळी पावसाने तिवसा तालुक्यातील खरीप, रब्बी, भाजीपाला व फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वेचणी राहिलेला कापूस बोंडातच भिजला. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला. अशा परिस्थितीत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचा आदेश असतानाही महसूल व कृषी प्रशासनाने बाधित भागाचे पंचनामे केले नाहीत, त्यामुळे शासनाला अहवाल गेलेला नाही.

परिणामी, नुकसान झाल्यावरही तालुका शासन मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. नापिकीला कंटाळून वहा येथील शेतकरी राजू चर्जन यांनी आत्महत्या केलेली आहे. त्यामुळे प्रहारद्वारा मंगळवारी या शेतकऱ्याची दशक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाचे परिसरात करण्यात आली. यावेळी योगेश लोखंडे, बाबाराव ठाकरे, अंकुश गायकवाड, सतीश गावंडे, अशोक लांजेवार, पंकज चौधरी, प्रवीण केणे, रवी पाथरे, नरेंद्र काकडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो-खो (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठ चमू घोषित




**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती : –** स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्यावतीने के.के.एम. महाविद्यालय, मनवट, परभणी येथे दिनांक १९ ते २२ जानेवारी, २०२४ दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो-खो (पुरुष) स्पर्धेसाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. निवड झालेल्या खेळाडूंचा प्रशिक्षणवर्ग श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे दि. १४ ते १७ जानेवारी दरम्यान होणार आहे.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचा रोशन पिवल,पवन गुप्ता,रोहित चव्हाण व सर्वेश इंगळे, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा यश सदांशिव, अनुराग कुबडे, प्रतिक पाल व पियुष दहाट, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा गौरव दहिलेकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा अभिषेक पातालवंशी, शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगांवचा शुभम सुरोसे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा धनसिंग वड्डे, कै. एन.ए.डी. महाविद्यालय, चांदुरबाजारचा रितेश कु-हाडे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा मयुर भगत, जी.एस.टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा प्रथमेश साखरकर, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाचा अमिन रोढीवाले, श्री व्ही.एन. महाविद्यालय, मंगरुळपीरचा विकास मुठळ व डॉ. आर.जी. राठोड महाविद्यालय, मूर्तिजापूरचा दत्ता गावंडे यांचा समावेश आहे.

निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी, प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

# उद्यापासून राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दोन दिवसीय क्रीडा स्पर्धा



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग येथे ५८ व्या वार्षीक क्रिडा स्पर्धेचे आयोजन दिनांक- १८ ते २० जानेवारी या कालावधीमध्ये हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे आयोजीत करण्यात आलेले आहे. क्रिडा स्पर्धेमध्ये उंच उडी, लांब उडी, १००,२००,४०० मिटर धावणे, रिले, कुस्ती, कबड्डी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक इ. खेळांचा समावेश आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून क्रिडा स्पर्धेकरिता रा.प.चे जवळपास ७५० खेळाडू व १०० महिला खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहे.

दि.१८ जानेवारी २०२४ रोजीचे क्रिडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, (भा.प्र.से.), नविनचंद्र रेड्डी, (भा.पो.से.) पोलीस आयुक्त अमरावती, देविदास पवार (सामन्य प्रशासन) महानगर पालिका आयुक्त अमरावती वमोहनदास भरसट महाव्यवस्थापक (क.व.औ.सं) म.रा.मा.प. महामंडळ मध्यवर्ती कार्यालय यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तसेच दि. २० जानेवारी २०२४ रोजीचे पारितोषीक वितरण समारंभ कार्यक्रमास अविश्यांत पंडा, (भा.प्र.से) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, मा. श्री. विशाल आनंद (भा.पो.से) पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण, रा.प. महामंडळाचे श्री. महादेव कुचेकर (भा.प्र.से.) मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची उपस्थिती राहणार आहे सदर क्रिडा स्पर्धेकरिता प्रो कबड्डी चे स्टार खेळाडू श्री. आनंद तोमर व श्री. अनिल तोरकट कुस्तीपटू (नागभूषण पुरस्कार प्राप्त) यांची उपस्थिती राहणार आहे. करिता मोठया संख्येने हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे उपस्थित राहून रा.प.कर्मचारी यांचा उत्साह द्विगुणीत करावा असे आवाहन श्री. निलेशकुमार शेषराव बेलसरे, विभाग नियंत्रक रा.प.अमरावती यांनी केले आहे.

**पाहिजेत**

**विदर्भ प्रजासत्ताक**
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क- prajasattaknews24gmail.com

# आकाश राजपूत ठरला 'विदर्भ धनराज श्री'

## विदर्भस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताकपथ्रोट, ५४**

राणा धनराजसिह राणावत चॅरिटेबल ट्रस्टद्वारा आयोजित विदर्भस्तरीय शरीर सौष्ठत्व स्पर्धेत अमरावती येथील आकाश राजपूतने 'विदर्भ धनराज श्री' चा किताब पटकावला. आकाशला बेल्ट, ट्रॉफी व ३१ हजार रुपये रोख पारितोषिक देऊन कार्यक्रमाच्या आयोजक वासंती मंगरोळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

विदर्भ बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशनच्या मान्यतेने अमरावती बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशनच्या सहकार्याने पथ्रोट येथील समर्थ जिमच्या वतीने ग्रामपंचायतच्या पटांगणावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा माजी जि. प. सदस्या वासंती मंगरोळे, उद्घाटक जिल्हा काँग्रेस अध्यक्ष बबलू देशमुख, प्रमुख अतिथी आ. बळवंत वानखडे, राष्ट्रवादी प्रदेश सचिव स्मिता लहाने, उबाठा शिवसेना संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, सहसंपर्क प्रमुख दिनेश बूब, पं. स. उपसभापती अमोल चिमोटे, काँग्रेस तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे, शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे, उबाठा शिवसेना तालुकाप्रमुख बंडू घोम, ठाणेदार विनायक लम्बे, पोलिस पाटील नितीन गोरले, नरेंद्र पडोळे, अभिजित काळमेघ, आशीष सहारे, प्रमोद डिके, काँग्रेस अध्यक्ष मामराज कडू, अनुप अरबट, संदीप लव्हाळे, महेश राऊत बिट्टू मंगरोळे यांची उपस्थिती होती.

'विदर्भ श्री'या मुख्य किताबासाठी ८० किलो वजन गटातील अमरावती येथील आकाश राजपूत यशाचा मानकरी ठरला. ६०, ६५, ७५, ८० आणि ८० च्या वरच्या गटात विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांचा प्रशस्तीपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सहा वजन गटात स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये पहिल्या गटातील बुलढाणा येथील दत्तात्रय सावरकर, दुसर्या गटातील चंद्रपूर येथील पंकज मडके, तिसर्या गटातील अकोला येथील शे. सलीम, चौथ्या गटातील अमरावती येथील सै. वाजीद, पाचव्या गटातील नागपूर येथील योगेश शेंडे व सहाव्या गटातील अमरावती येथील आकाश राजपूत यांनी प्रथम क्रमांक मिळविला आणि या सहा गटामधून प्रथम आलेल्या स्पर्धकामधून विदर्भ धनराज श्री निवडण्यात आला. त्याचा बहूमान आकाश राजपूतला मिळाला.

# शनिवारी अमरावतीत मंदिर न्यास अधिवेशन

## हिंदू जनजागृती समिती व अन्य संस्थानचे आयोजन




**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

हिंदूंना आध्यात्मिक बळ देणार्या 'भारतीय मंदिर संस्कृती'चे जतन, संवर्धन आणि मंदिर विश्वस्तांचे संघटन होण्यासाठी हिंदु जनजागृती समिती, महाराष्ट्र मंदिर महासंघ, पिंगळादेवी संस्थान, नागेश्वर महादेव संस्थान, देवस्थान सेवा समिती, व्यंकटेश बालाजी मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने २० जानेवारी रोजी महेश भवन येथे महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशनाचे (अमरावती-विदर्भ प्रांत) आयोजन करण्यात आले असल्याची माहिति हिंदु जनजागृती समिती तथा मंदिर महासंघाचे समन्वयक नीलेश टवलारे यांनी मंगळवारी दिली.

महाराष्ट्र मंदिर महासंघाचेराज्यस्तरीय सदस्य अनुप जयस्वाल म्हणाले, या परिषदेला अमरावती तसेच विदर्भाच्या अन्य जिल्ह्यातून ६५० हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत. यात मुख्यत्वेकरून सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरू स्वाती खाडये, अशोक पात्रीकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट, भीमाशंकर ज्योतीर्लींग संस्थानचे सचिव अधिवक्ता सुरेश कौदरे, मंगळग्रह संस्थान अंमळनेरचे अध्यक्ष दिगंबर महाले आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. मंदिर अधिवेशनामध्ये मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत विविध विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत.

यामध्ये मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे, मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे, वक्फ कायद्याद्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यावर उपाय, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य-मांस बंदी, दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे.पत्रकार परिषदेला पिंगळादेवी संस्थानचे विनित पाखोडे, आशीष मारूडकर, यंकटेश बालाजी मंदिर ट्रस्टचे अधिवक्ता आर. बी. अटल, नागेश्वर महादेव संस्थानचे कैलास पनपालिया व विजय करडे, अवधूत महाराज संस्थानचे विश्वस्त अशोक सोनवले, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे अनुप जयस्वाल उपस्थित होते. ही परिषद केवळ निमंत्रितांसाठी असून याविषयी अधिक माहितीसाठी ८००७६३०९१३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर महासंघाने केले आहे.

## ठाकरे गटाकडून अकोल्यात सत्ताधाऱ्यांची कोंडी

**दि. १७ विदर्भ प्रजासत्ताक अकोला :**

गेल्या काही महिन्यांपासून अकोल्यातील गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ झाली. बाहेरगावावरून शहरात शिकण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्याची हत्या झाल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. हा गंभीर मुद्दा उचलून शिवसेनेच्या ठाकरे गटाने भाजपसह सत्ताधाऱ्यांना चांगलेच कोंडीत पकडले. शिवसेनेने काढलेल्या मूक मोर्चाला विद्यार्थ्यांसह नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या माध्यमातून शिवसेनेने लक्ष वेधून घेत सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणण्याचे प्रयत्न केले. अकोला जिल्हा अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखला जातो. गेल्या काही महिन्यांमध्ये जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याचे चित्र आहे. हत्या, अपहरण, अत्याचार, चोरी, दरोड्याचा प्रयत्न आदी घटनांमध्ये वाढ झाली.

# ऋणमोचन येथे यात्रा महोत्सवाला प्रारंभ

## १६ फेब्रुवारीपर्यंत दर रविवारी यात्रा



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक टाकरखेडा शंभु**

भातकुली तालुक्यातील ऋणमोचन येथे १४ जानेवारी ते १६ फेब्रुवारी या दरम्यान दर रविवारी आयोजित यात्रा महोत्सवाकरिता भातकुली पंचायत समिती प्रशासन सज्ज झाले आहे. येणार्या भाविक भक्तांकरिता सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून संपूर्ण परिसराची साफसफाई करण्यात आली आहे.

भातकुली तालुक्यातील ऋणमोचन यात्रा महोत्सव अनेक वर्षांपासून सुरू आहे. तालुक्यात या यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे दरवर्षी या यात्रेत लाखोंच्या संख्येने भक्त येतात. महत्त्वाची बाब म्हणजे, ही यात्रा आठवड्यातून एकच दिवस म्हणजे महिनाभर दर रविवारीच भरते. १४ जानेवारीपासून यात्रेला सुरूवात झाली असून पुढील आठवड्यात २१ जानेवारी, २८ जानेवारी तर फेब्रुवारीमध्ये ४ व १६ फेब्रुवारीला यात्रा भरणार आहे.येथे येणार्या भक्तांची तसेच दुकानदारांची गैरसोय टाळण्याकरिता भातकुली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तथा प्रशासक डॉ. प्रफुल्ल भोरखडे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रल्हाद तेलंग यांच्या मागदर्शनातील व्यवस्थापन समितीच्या वतीने भक्तांसाठी पिण्याचे पाणी, परिसर साफसफाई, स्नान गृह, निवास व्यवस्था, नदी घाटावरील साफसफाई, रस्त्यावरील दिव्यांची व्यवस्था, रस्ते साफसफाई, दुकाने थाटण्यासाठी प्लॉटची व्यवस्था, मंदिराची रंगरंगोटी आदी प्रकारची सुविधा येथे करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व सचिव यांचे देखील व्यवस्थेमध्ये सहकार्य मिळत आहे.

# सहा महिन्यांऐवजी दोन वर्षांनंतर दाखल करता येणार अविश्वास प्रस्ताव

## जिल्हा बँक अध्यक्ष, उपाध्यक्ष प्रकरण

**दि१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

बहुमतात नसतानाही अध्यक्ष, उपाध्यक्षांनी विरोधी गटातील संचालकांना आपल्या गटात घेत केवळ आठ संचालकांवर सत्ता हस्तगत केली. त्यामुळे अध्यक्षपदी आ. बच्चू कडू तर उपाध्यक्षपदी अभिजित ढेपे विराजमान झाले. परंतु, त्यानंतर पुन्हा १३ संचालकांचा गट एकत्र आला. त्यामुळे विरोधकांनी अध्यक्ष, उपाध्यक्षांवर सहा महिन्यांनंतर अविश्वास आणून आपली सत्ता प्रस्थापित करण्याचे स्वप्न रंगविले होते. सत्ताधारी गटातील रवींद्र गायगोले यांचा मनभंग झाल्याने विरोधकांचे स्वप्न पूर्ण होण्याच्या मार्गावर असतानाच अविश्वास ठरावाची मुदत दोन वर्षांपर्यंत



वाढविणाऱ्या अध्यादेशाने विरोधकांच्या स्वप्नांचा चुराडा केला आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सर्वाधिक १३ संचालक निवडून आणून बबलू देशमुख गटाने सत्ता स्थापन केली होती. सुधाकर भारसाकडे यांच्यागळ्यात अध्यक्षपदाची माळ घालत दीड वर्षे त्यांनी सत्ता उपभोगली. परंतु, अध्यक्ष बदलण्याच्या नादात अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी राजीनामा दिला आणि तिच संधी आ. बच्चू कडू यांनी बांधली. आ. बच्चू कडू यांनीकेवळ त्यांच्या गटात असलेल्या आठ संचालकांच्या बळावर २६ जुलै १२०२३ रोजी बँकेत सत्ता स्थापन केली. त्यामुळे आ. बच्चू कडू अध्यक्ष तर अभिजित ढेपे हे उपाध्यक्ष झाले. या दरम्यान सत्ताधाऱ्यांनी अनेक निर्णय घेतले. त्यामुळे बहुमतातील ११३ संचालकांना याचा चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. परिणामी, विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांविरोधातील तक्रारीचा सपाटा सुरू केला. परंतु, त्यांना सहकार विभागाकडून आजवरहीयश मिळाले नाही. त्यामुळे २६ जानेवारीला सहा महिने पूर्ण होत असल्याने या सत्ताधाऱ्यांनच सत्तेतून खाली खेचण्याकरिता अविश्वासाचे शस्त्र वापरण्याचा निर्धार विरोधकांनी केला, यात भर म्हणून रवींद्र गायगोले आणि सत्ताधाऱ्यांमध्ये मतभेद वाढले. त्यामुळे अविश्वास ठरावाकरिता हवे असलेल्या १४ संचालकांचा कोरम पूर्ण होण्याचे स्वप्न बाळगत येत्या २६ जानेवारीनंतर अविश्वास आणण्याचा मनसुबा विरोधकांनी केला.परंतु, विधानमंडव्यत सहकारातील या नियमात दुरूस्ती करीत सहा महिन्यांऐवजी दोन वर्षांचा कालावधी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर राज्यपालांच्या स्वाक्षरीने शासन निर्णय सत्ताधाऱ्यांचे सहा महिने पूर्ण होण्यापूर्वीच शुक्रवारी घडकला.

या निर्णयामुळे विरोधकांचे सत्ता स्थापनेचे स्वप्न पुन्हा धुसर झाले आहे. त्यामुळे आता त्यांना अविश्वास दाखल करण्याकरिता दोन वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे.



# जिल्हास्तरीय चित्रकला, रंगभरण स्पर्धेला प्रतिसाद

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विद्यार्थ्यांच्याकलागुणांना वाव देण्याकरिता तसेच त्यांच्यातील सुप्त गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना खासगी विभाग, अमरावतीच्या वतीने जिल्हास्तरीय चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन रविवार, १४ जानेवारी रोजी आदर्श प्राथमिक शाळा, खापर्डे बगीचा, अमरावती येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना खासगी विभाग, अमरावतीचे अध्यक्ष रुपेश टाले तर प्रमुख अतिथी म्हणून बालशिक्षण संस्थेच्या अध्यक्षा संध्या मराठे, सचिव सुनंदा हुशंगाबादकर, विस्तार अधिकारी गिरी, किरण तंवर आदी उपस्थित होते.ही स्पर्धा पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली, तीन गटांत ही स्पर्धा पार पडली. कार्यक्रमाचे संचालन किर्ती पिंजरकरयांनी केले. यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना खासगी विभाग, अमरावतीचे श्रीकांत देशमुख, प्रवीण वाटाणे, अतुल खाडे, गोपाल भोजने, अमित वेले, वंदना अडकणे, सुनीता बेलोरे, तृप्ती देशपांडे, वर्मा, श्वेता वाकोडे आदींची उपस्थिती होती.

# संस्था चालकांचा परीक्षांवर बहिष्कार : विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांना निवेदन

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती.**

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने जाहिर केलेल्या राज्यव्यापी 'परीक्षांवर बहिष्कार' आंदोलनाला पाठींबा देवून फेब्रु.व मार्च २०२४ च्या दहावी व बारावी परीक्षा बहिष्कार आंदोलनात एकजुटीने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यासाठी आज शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा निलिमा टाके यांना आ. किरण सरनाईक यांच्या नेतृत्वात विभागाच्या पाचही जिल्ह्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

सदर आंदोलनाची तातडीने दखल घेण्यात यावी, यासाठी मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री यांना विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या मार्फतही निवेदन पाठविण्यात आले. सदर निवेदनामध्ये पवित्र पोर्टल रद्दकरुन सन २०१२ पासून शिक्षक पद भरती करण्यात न आल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित झाले आहे. शाळा व संस्थेतील शिक्षकांची रिक्तपदे सरळ सेवा भरतीद्वारे तात्काळ



भरण्याची परवानगी देण्याचे आदेश द्यावे. शाळांमधील व्यपगत ठरविण्यात आलेली चतुर्थ कर्मचारी पदे बहाल करुन भरण्याचे आणि शिक्षकेत्तर कर्मचारी पदे तात्काळ भरण्याचे आदेश निर्गमीत करावेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन अनुदानावर आधारीत वेतनेत्तर अनुदान तातडीने संस्थांना देण्यात यावे, या मागण्यांचा त्यात समावेश आहे.

मराठी शाळा व बहुजनांचे शिक्षण वाचविण्यासाठी हाशिक्षण संस्था चालकांचा लढा असून या लढ्यात सर्व शिक्षण संस्था चालकांनी एकजुटीने सहभागी व्हावे असे आवाहन याप्रसंगी आ. किरण सरनाईक, विभागीय समन्वयक विजय कौशल, जिल्हाध्यक्ष कांचनमाला गावंडे, सचिव मेघश्याम करडे, वसंत दुईखेडकर, अँड वक्रे, रामकृष्ण कळसकर, अशोक दूरबळे, सुशिल इखनकर, राजाभाऊ देशमुख, महेन्द्र सोमवंशी, सुभाष गिते, दिपक येरडे, रवींद्र वासनकर, योगेश उमक, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष ललित चौधरी, प्रवीण हिवे, दिलीप कडू, प्रदीप नानोरे यांच्यासह अन्य शिक्षण संस्था चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंधन बचत करणे काळाची गरज : गोपाल चोरमले

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताकचांदूर बाजार**

इंधन बचत करणे काळाची गरज झाली असल्याचे एसटी आगाराच्या इंधन बचत मासिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी आगार व्यवस्थापक गोपाल चोरमले म्हणाले. या कार्यक्रमांमध्ये उप यंत्र अभियंता प्रवीण अंबुलकर , वाहतूक पर्यवेक्षक सौ भटकर ,आयटीआयचेगोपाल गावंडे, आगार व्यवस्थापक गोपाल चोरमले, सहा. वाहतूक अधीक्षक रावसाहेब मकेश्वर, आगार लेखाकार गौतम बनसोड, पत्रकार मदन भाटे, शरद केदार मंचकावर उपस्थित होते. पुढे बोलताना चोरमले ते म्हणाले की इंधन बचत ही मोहीम जरी १६ जानेवारी ते १५ फरवरी पर्यंत असली तरी आपल्या आगारातील कर्मचाऱ्यांनी ही वर्षभर राबवावी यातच महामंडळाचे हित आहे. तसेच त्यांनी यावेळी उपस्थित असलेल्या आपल्या कर्मचाऱ्यांना काही सूचना सुद्धा दिल्या. उप यंत्र अभियंता प्रवीण अंबुलकर यावेळी म्हणाले, इंधन बचत ही मोहीम यशस्वी करणे हे एसटी मधील सर्व कर्मचाऱ्यांचे सामूहिक जबाबदारी आहे व ती आपण पाळावी असे यावेळी आव्हानही केले.

# धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत राज्य सरकारने तात्काळ शिंदे समितीचा अहवाल मागवा

## धनगर बांधव धडकले अमरावती विभागीय आयुक्तांना कार्यालयावर : २६ जानेवारी पर्यंतची दिली मुदत



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत राज्य सरकारने शिंदे समिती नेमून केली होती.मात्र समिती स्थापन होवून एक महिना लोटला असला तरी अजून पर्यंत शिंदे समितीने राज्य सरकारला आपला अहवाल सादर केला नाही. त्यामुळे तो अहवाल तात्काळ राज्य सरकारने त्या समितीला मागावा यासाठी आज धनगर परिषद विदर्भ प्रदेश व अमरावती जिल्ह्यातील धनगर बांधवांनी अमरावती विभागीय आयुक्तांना निवेदन दिलेराज्य सरकार ने धनगर आरक्षणाचा विषय निकाली काढण्याचे ठरविले होते मात्र यासंदर्भात आजपर्यंत कोणत्याही प्रकारचे ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही.शिंदे समिती काही राज्यांचा अभ्यास करणार होती तो झाला का ? की अद्याप अभ्यासाला सुरुवातच झाली नाही ? की विना अभ्यासाचा निर्णय घेण्यात येणार ? किंवा कसे ? याबाबत सरकार सोईस्कर मौन राखून गप्प आहे का असे अनेक प्रश्न यावेळी धनगर बांधवांनी उपस्थित केले.२६ पर्यंत शासनाने धनगर परिषद विदर्भ प्रदेशाच्या धनगर समाज प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावून आरक्षणाबाबत ठोस कारवाई करावी अन्यथा २६ जानेवारी नंतर विदर्भातील धनगर समाज रस्त्यावर उतरेल असा इशारा यावेळी धनगर बांधवांकडून सरकारला देण्यात आला

# देशभरातच थंडीचा कडाका वाढला

## उत्तरेकडील राज्यांना थंडीचा 'रेड' व 'ऑरेंज' अलर्ट

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



उत्तरेकडील थंड वारे आता महाराष्ट्राच्या दिशेने वळले आहेत. त्यामुळे मध्य महाराष्ट्र,मराठवाड्यासह अनेक ठिकाणी थंडीचा कडाका वाढला आहे. काही जिल्ह्यांमध्ये किमानतापमानाचा पारा दहा अंशापेक्षाही कमी आहे. तर दुसरीकडे भारतीय हवामान खात्याने काही राज्यांमध्ये पावसाचा नाही तर चक्क थंडी आणि धुक्याचा 'ऑरेंज' व 'रेड अलर्ट' जाहीर केला आहे.राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे आणि किमान तापमान नऊ ते सोळा अंश सेल्सिअसच्या दरम्यान आहे. येत्या काही दिवसांत किमान तापमानात आणखी घट होण्याची आणि परिणामी गारठा वाढण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. विदर्भात मंगळवारपर्यंत उन्हाची चाहूल जाणवू लागली असतानाच आता बुधवारपासून पुन्हा आभाळी वातावरण आहे. तर बोचरे आणि गार वारे जाणवत आहे. उत्तरेकडील राज्यांमध्येही किमान तापमानात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे या राज्यांसह देशातील अनेक भागांत आता थंडीचा जोर वाढला आहे. पुढील काही दिवसही थंडीची लाट कायम राहणार असून भारतीय हवामान खात्याने अनेक राज्यांना पावसाचा नाही तर थंडी आणि धुक्यांचा 'ऑरेंज' व 'रेड अलर्ट' जाहीर केला आहे. दरम्यान वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशातील हवामानात येत्या काही दिवसांत बदलदेखील पाहायला मिळू शकतात, मध्यप्रदेशातदेखील किमान तापमानाचा पारा मंगळवारी ३.६ अंश सेल्सिअसवर पोहोचला. अनेक ठिकाणी ते चार ते पाच अंश सेल्सिअससुद्धा नोंदवण्यात आले. या राज्यातसुद्धा धुक्यांमुळे दृष्यमानता कमी झाली आहे.उत्तर भारतात थंडीचा सर्वाधिक कडाका असून दाट धुक्यांचे प्रमाण वाढत आहे. किमान पाच दिवस तरी यातून दिलासा नाही. कडाक्याची थंडी आणि धुके याचा प्रतिकूल परिणाम शेतीवरसुद्धा पडला आहे. दाट धुक्यांचा वाहतुकीवरदेखील मोठा परिणाम झाला आहे. दृष्यमानता कमी झाल्यामुळे वाहनचालकांची तारांबळ उडत आहे. केवळ रस्त्यावरील वाहतूकच नाही तर रेल्वे आणि विमान वाहतुकीवरसुद्धा त्याचा परिणाम झाला आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनधारकांना वाहने जपून चालवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर अनेक रेल्वे रद्द करण्यात आल्या असून काही उशिराने धावत आहे. विमान वाहतुकीच्या बाबतीतही हीच स्थिती आहे.

# पत्नीचे अनैतिक संबंध; पतीची आत्महत्या

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पत्नीचे अनैतिक संबंध आणि तिने सर्वांसमोर केलेल्या मारहाणीमुळे मानसिक तणावात आलेल्या पतीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली होती. या प्रकरणी मृत तरूणाच्या आईच्या तक्रारीवरून पत्नी व तिच्या प्रियकराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोर्शी ठाण्याच्या हद्दीतील एका गावात राहणाऱ्या ३० वर्षीय विवाहित तरुणाने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना ९ नोव्हेंबर २०२३ रोजी उघडकीस आली होती. या प्रकरणी त्याच्या आईने मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आपल्या मुलाच्या पत्नीचे गावातीलच एका तरुणासोबत प्रेमसंबंध आहेत. ती मनाप्रमाणे आपल्या नातवाला घरी ठेवून बाहेर जात होती. मनाला वाटेल तेव्हा घरी परत येत होती. याबाबत मुलाने तिला काही म्हटल्यास ती त्याच्याशी वाद घालत होती. तर तिचा प्रियकर हा आपल्या मुलाला धमकावत होता.आपल्या मुलाने पत्नीला पैशांबाबत विचारणा केल्यावर तिने त्याच्याशी वाद घातला. या वादात तिने आपल्या मुलाला परिसरातील लोकांसमोर लाथ मारून खाली पाडले. त्याला मारहाण करून पाठीला चावासुद्धा घेतला. त्यानंतर ती घरून निघाली गेली. या घटनेनंतर आपला मुलगा हा मानसिक तणावात होता. पत्नीचे अनैतिक संबंध, तिने केलेली मारहाण तसेच तिच्यासह प्रियकराच्या त्रासाला कंटाळूनच आपल्या मुलाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली, असे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीवरून पोलिसांनी मृताची पत्नी व तिच्या प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मातोश्रीवरचा अनुभव वाईट, अशाने ठाकरे सेना संपेल



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक वर्धा**

आपल्या वऱ्हाडी बोलीने सर्वत्र ओळखले जाणारे नितेश कराळे सध्या नाराज आहेत. ते एक प्रखर मोदी विरोधक म्हणून ओळखले जातात. कराळे 'इंडिया' आघाडीचे समर्थक असल्याचे सांगतात. परंतु, याच आघाडीचा घटक पक्ष असलेल्या सेनेच्या ठाकरे गटाची सदिच्छा भेट घेण्याची त्यांची इच्छा होती. म्हणून सोमवारी सकाळी त्यांनी मुंबईत 'मातोश्री' गाठले. पण, त्यांना आलेला अनुभव अत्यंत वाईट होता, असे त्यांचे म्हणणे आहे.


उद्धव ठाकरेंना भेटण्यासाठी मीअंबादास दानवेयांचे सचिव पंडित यांना फोन केल्यावर त्यांनी ठाकरे यांचे खाजगी सचिव मात्रे यांचा मोबाईलक्रमांक दिला. बंगल्यावर गेल्यावर त्यांना अनेकवेळा फोन केले. पण उत्तर मिळाले नाही. मातोश्रीवर उपस्थित पोलिसांशी बोललो तेव्हा ते म्हणाले, बारा वाजताशिवाय भेट होणे शक्य नाही. या दरम्यान माझ्यासाठी अनेक जिल्हाप्रमुखांनी म्हात्रेंना फोन केले. बऱ्याच वेळाने म्हात्रेंनी निरोप पाठविला. मात्र ते चिडूनच बोलले. मी तुला बोलावले काय, असे ते दरडावले. तिथे उपस्थित विनायक राऊत यांच्याशी भेट झाली. त्यांनी माझे प्रोफाईल मागितले. उध्दव ठाकरे यांच्याकडे पाठवितो म्हणाले. मात्र नंतर त्यांनी आदित्य ठाकरेंना भेटण्याचे सुचविले. ठाकरेंशी भेट न मिळाल्याने मी बाहेर पडू लागलो. मग मात्र निरोपावर निरोप आले. मी मात्र स्पष्ट नाकारले. आम्ही अपमान करून घेण्यासाठी आलो काय, असे म्हणत परत फिरल्याचे कराळे सांगतात.महाराष्ट्राचे नेते म्हणवतात अन घरी अशी वागणूक मिळते. धड बसायला जागा नाही. चहा विचारणे नाही. हे काय पटण्यासारखे नाही. अशाने सेना संपायला वेळ लागणार नाही, अशी खदखद कराळे यांनी व्यक्त केली. काँग्रेसच्या तिकिटावर लढण्याची चर्चा असताना सेनेकडे कसे, अशी विचारणा केल्यावर ते म्हणतात की सध्या निश्चित नाही. मात्र इंडिया आघाडीकडून लढण्याचे ठरविल्याने आघाडीचा घटक पक्ष असणाऱ्या सेना श्रेष्ठींच्या बंगल्यावर गेलो. मात्र सकाळी साडे सात ते दुपारी अडीचपर्यंत जो अनुभव आला, तो अत्यंत वाईट ठरला.

# संगणक अन् लॅपटॉपमुळे काम झाले सोपे; मात्र डोळे व आरोग्याचा धोका वाढला?

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

इंटरनेट सुविधेमुळे जग लहानझाल्यासारखे भासत आहे. आज बहुतेक कामकाज लॅपटॉप, कॉम्प्युटरवर करणे सहज शक्य झाले आहे. त्यामुळे संगणक व लॅपटॉपचा वापर वाढला आहे; परंतु, सतत कॉम्प्युटर, लॅपटॉपवर काम केल्यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. त्यामुळे पाठ, मान आणि खांदेदुखीचे आजार वाढले आहेत.

आधुनिक तंत्रज्ञान अवगत झाल्याने कामकाज करताना संगणक व लॅपटॉपचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे.



सध्याचे जग तंत्रज्ञानयुक्त आहे. सध्या संगणक व लॅपटॉप यासह मोबाइलवर तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर काम करत आहेत. मात्र, हा गी वापर करताना कसलेच नियोजन नसल्याने पाठ, मान, मणके यासह अनेक आजार पडले जात आहेत. यासाठी दिनक्रम ठरवून काम करावे. वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करावा.

**डॉ.विशेश्वर कुर्तकोटी अस्थीरोग तज्ञअमरावती**

**डोळ्याचे आजार :** कायम संगणक व लॅपटॉपवर काम करत असताना नजर समोर ठेवली जाते. यातून प्रकाश सरळ डोळ्यावर जात असल्याने डोळ्यांचेदेखील आजार वाढले आहेत.

**बोटांचे आजार :** हाताच्या बोटाला आराम न देता सतत संगणक वापरले तर मुंग्या येणे, बधिर पडणे, कधी त्या हाताला अपंगत्वदेखील येऊ शकते. त्यामुळे काम करताना थोडा विश्राम करावा.

**पाठीचे आजार :** सारखे एकाच जागेवर बसून व संगणक किंवा लॅपटॉपचा अतिवापर केला तर पाठीच्या मणक्याचा त्रास होतो. यामुळे वेळीच लक्ष न दिल्यास मणक्याला बाकही बसू शकतो.

सातत्याची बैठक आणि संगणक हाताळण्याच्या योग्य पद्धती वापरल्यास दुखापती टाळता येतात. तंत्रज्ञानाचा वापर करताना अनेकजण कार्यालयीन कामाचे नियोजन करीत नसतात. परिणामी, एकाच जागी तासनतास बसून काम केल्याने मान, पाठ, मणके यासह डोळ्यांचेदेखील आजार वाढले आहेत.

# माधान येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

## राज्यसभा खासदार राकेश सिन्हा व खा. डॉ. अनिल बोंडे यांनी केले रथाचे पूजन

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विकसित भारत संकल्प यात्रा म्हणजे मोदी की गॅरंटी ची गाडी चांदुर बाजार तालुक्यातील माधान या गावी आली असता त्याचे पूजन बिहार चे राज्यसभा खासदार राकेश सिन्हा व खासदार डॉ अनिल बोंडे यांचे हस्ते गावातील ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडले.

केंद्र सरकारने गेल्या १० वर्षात अनेक लोकपयोगी योजना कार्यान्वित केल्या त्यामुळे देशातील करोडो नागरिकांना त्याचा लाभ मिळाला. मोदी सरकारच्या सर्व योजना जनतेला माहिती व्हावा याकरिता विकसित भारत संकल्प यात्रा चे रथ संपूर्ण गावागावामध्ये जाऊन जनतेला माहिती देत आहे.चांदूर बाजार तालुक्यातील माधान या गावात या रथाचे स्वागत करण्याकरिता राज्यसभा खासदार राकेश सिन्हा यांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. मोदी जी ने महिला ना सक्षम करण्याकरिता अनेक योजना अमलात आणल्या. मुलांच्या



भविष्याकरिता अनेक योजना व स्किल प्रशिक्षण चे कार्यक्रम राबविले. प्रधानमन्त्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ मधील भारताचे चित्र डोळ्यासमोर ठेवून विकासकार्य केले. असे प्रतिपादन खासदार राकेश सिन्हा यांनी केले.

यावेळी राज्यसभा सदस्य तथा अमरावती जिल्हाअध्यक्ष डॉ अनिल बोंडे, सरपंच सौ. पद्माताई मेसकर, उपसरपंच श्री. अतुलजी दाऱोकार, नांदुभाऊ वासनकर, प्रवीणजी तायडे विधानसभा निवडणूक प्रमुख मुरली माकोडे मंडल अध्यक्ष चांदुर बाजार,मनोहरजी सुने,प्रदीपजी पंडागडे, सुधीर रसे, गोपाल तिरमारे, बाळासाहेब सोनार,संजय थेलकर,. साहेबराव आस्वार, संजयजी पकडे, श्री. प्रणित खवले, राजेश पकडे, अनिलजी वाठ,.सुखदेवराव पवार, श्रीमती मंदा राजकुमार पावडे सरपंच दीपाली राजकुमार खंडारे उपसरपंच सुकेशनी वि डवके ग्रामपंचायत सदस्य धीरज उके ग्रामपंचायत सदस्यअस्विनी मो धावडे ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील रा पावडे बूथ प्रमुख रमेशराव गो डोक शक्ती प्रमुख आनंदरावखांडेकर भाजपा विकासराव पाटेकर साहेबराव भागवत रतन पाटेकर राजेश बोबडे दिपक गोहत्रे सह विद्यार्थी वर्ग व अधिकारी उपस्थित होते.

# अमरावतीत २७ जानेवारी रोजी भव्य रोग निदान व उपचार शिबिर

## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती महोत्सवानिमित्त आयोजन

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शिवसेनाप्रमुख हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती महोत्सवांतर्गत येत्या २७ जानेवारी रोजी अमरावतीत भव्य सर्व रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन शिवसेना अमरावती जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे .हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती ही महोत्सव म्हणून साजरी करण्यात येत असून त्यानिमित्त शिवसेना अमरावती जिल्हा तर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शनिवार दिनांक २७ जानेवारी रोजी सकाळी ९ ते २ या वेळात साईनगर बेनाम चौक स्थित भक्ति मंदिर नजीकच्या प्रांगणात सर्व रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टर आपली सेवा देणार असून नेत्ररोग ,सर्जरी, स्त्रीरोग ,बालरोग, कान ,नाक ,घसा अस्थि रोग ,त्वचारोग ,श्वसन



विकार अशा विविध आजाराचे निदान करून उपचार करण्यात येणार आहे. शिबिरामध्ये तपासणी करून उपचारासाठी निवडलेल्या रुग्णांवर सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येणार आहे .सोबतच एक्स-रे ,रक्त ,लघवी, सोनोग्राफी आदी चाचण्या मोफत करण्यात येऊन सिटीस्कॅन ,एमआरआय आदी विशिष्ट चाचण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जाणार आहे .भरती रुग्णांना खाट शुल्क व जेवण मोफत असून काही रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच अन्य योजनांचा लाभ दिला जाणार असल्याची माहिती शिबिराचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे व दत्ता मेघे आयुरविज्ञान संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉक्टर अभ्युदय मेघे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

### अमरावतीकरांनी लाभ घ्यावा – सुनील खराटे



आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्य समस्या बिकट झाल्या असून रोग निदान व उपचार आर्थिकदृष्ट्या न परवडणारे झाले आहे ही बाब लक्षात घेता समाजातील गोरगरीब रुग्णांची तपासणी होऊन त्यांना मोफत उपचार मिळावा यासाठी या भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरातून शस्त्रक्रियेसाठी किंवा उपचारासाठी निवडलेल्या रुग्णांवर सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचार करण्यात येणार असून मोतीया बिंदू, हायड्रोसिल ,हर्निया आदी शस्त्रक्रिया अगदी नाममात्र दरात करण्यात येणार आहे .तरी अमरावतीकरांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केले आहे.